NAAC Accredited-2022
'B++'Grade (CGPA-2.96)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या तातडीच्या १६६ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## शुक्रवार, दि.२२ डिसेंबर, २०२३ सकाळी ११:३० वा.



प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची तातडीची १६६ वी बैठक **शुक्रवार, दि.२२ डिसेंबर, २०२३ रोजी सकाळी ११:३० वा.** राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृहात मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. डॉ. प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | सदस्य | उपस्थित |
| २) | डॉ. लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | उपस्थित |
| ४) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | उपस्थित |
| ५) | प्रा. (डॉ.) बाळकृष्ण जगन्नाथ लोखंडे | सदस्य | उपस्थित |
| ६) | प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार | सदस्य | उपस्थित |
| ७) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| ८) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| ९) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| १०) | श्री. महादेव दऱ्याप्पा कमळे | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| ११) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १२) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| १३) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १४) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| १५) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | उपस्थित |
| १६) | डॉ. नलिनी टेंभेकर, विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), सोलापूर (मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई नामनिर्देशित) | सदस्या | अनुपस्थित |
| १७) | डॉ. शैलेंद्र देवळाणकर, मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य | अनुपस्थित |
| १८) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण) तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| १९) | योगिनी घारे, प्रभारी वित्त व लेखाधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| २०) | डॉ. मलिक सगाजी रोकडे प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २१) | योगिनी घारे, कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

स्वागत:

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले. तसेच डॉ. लक्ष्मीकांत बसवराज दामा, प्र-कुलगुरु यांची ही पहिलीच बैठक असल्याने त्यांचे व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा.कुलगुरु यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देवून स्वागत करण्यात आले.

अनुपस्थिती:

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस श्री. महादेव दत्ताप्पा कमळे व श्री. सुधाकर तुकाराम सरवदे यांनी दुरध्वनीद्वारे/पत्राद्वारे अनुपस्थिती कळविली होती, त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली.

डॉ. नलिनी टेंभेकर, विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), सोलापूर (मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई नामनिर्देशित), डॉ. शैलेंद्र देवळाणकर, मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे व डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण) तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई हे सदस्य या बैठकीस अनुपस्थित होते.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०१ ] | दि.०४ डिसेंबर, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १६५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांताची नोंद घेण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | दि.२५ ऑक्टोबर, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १६३ व्या बैठकीचा कार्यवृत्तांतामध्ये खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली आहे. | |
| | पान क्र.२४ व आयत्या वेळेचा विषय क्र.१८(१) मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. | |
| | पूर्वीचा ठराव | |
| | प्रस्तुत विद्यापीठातील अधिविभागात कार्यरत असणाऱ्या कंत्राटी प्राध्यापकांना सेमिनार, विविध प्राधिकरणे यावर सहभागी होण्यासाठी नियमानुसार कर्तव्य रजा देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | दुरुस्त केलेला ठराव | |
| | प्रस्तुत विद्यापीठातील अधिविभागात कार्यरत असणाऱ्या कंत्राटी प्राध्यापकांना सेमिनार, विविध प्राधिकरणे यावर सहभागी होण्यासाठी मा. कुलगुरु यांच्या अधिकाराखाली कर्तव्य रजा देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. | |
| | दि.०४ डिसेंबर, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १६५ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत सर्वानुमते कायम करण्यात आला. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०२ ] | १) दि.२५ ऑक्टोबर, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १६३ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्याची बाब विचारार्थ.<br>२) दि.०१ नोव्हेंबर, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १६४ व्या तातडीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | १) दि.२५ ऑक्टोबर, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १६३ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.<br>२) दि.०१ नोव्हेंबर, २०२३ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १६४ व्या तातडीच्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली. | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [०३] | प्रस्तुत विद्यापीठास सन २०२३-२४ साठी कंत्राटी सुरक्षा अधिकारी व सुरक्षा रक्षक खासगी कंत्राटदारामार्फत ई-निविदाची प्रक्रिया राबवून घेण्यासाठी ई-निविदाची प्रक्रिया वित्त व लेखा (खरेदी व भांडार) विभागाकडून सुरु केल्याची बाब व सद्यस्थितीत प्रस्तुत विद्यापीठास सुरक्षेच्या कामासाठी कंत्राटी पध्दतीने सुरक्षा अधिकारी व सुरक्षा रक्षक पुरवठा करणारे कंत्राटदार मे. अभिजित इंटेलिजन्स सिक्युरिटी ॲन्ड लेबर सप्लायर, नागपूर यांना कंत्राटी सुरक्षा रक्षक पुरवठा करण्याबाबत देण्यात आलेल्या पुरवठा आदेशाची मुदत दि.०३/११/२०२३ रोजी अंतिम असल्याने व ई-निविदेची प्रक्रिया सुरु असल्याने दि.०४/११/२०२३ पासून ई-निविदेची प्रक्रिया पूर्ण होऊन नविन कंत्राटदार नियुक्त होईपर्यंतच्या कालावधीसाठी पूर्वीच्याच सेवाशर्ती व सेवाशुल्कनुसार मुदत वाढ देण्यात आल्याची बाब माहितीस्तव.<br>टिपणी: सद्यस्थितीत खासगी कंत्राटदार मे. अभिजित इंटेलिजन्स सिक्युरिटी ॲन्ड लेबर सप्लायर, नागपूर यांच्याकडून प्रस्तुत विद्यापीठात कंत्राटी सुरक्षा अधिकारी व सुरक्षा रक्षक दि.०४/१२/२०२२ ते दि.०३/११/२०२३ या कालावधीसाठी पुरविण्यात येत आहेत. सदर कंत्राटदाराची मूदत दि.०३/११/२०२३ पर्यंत आहे व सन २०२२-२३ मध्ये कंत्राटी सुरक्षा अधिकारी व सुरक्षा रक्षक घेण्यासाठी राबविण्यात आलेल्या ई-निविदाच्या नियमावलीमधील GENERAL CONDITIONS OF CONTRACT या मथळयाखाली अ.क्र.८ OTHER CONDITIONS मधील ८.१ मध्ये नमूद केलेल्या अटीनुसार सद्य:स्थितीतील खासगी कंत्राटदार मे. अभिजित इंटेलिजन्स सिक्युरिटी ॲन्ड लेबर सप्लायर, नागपूर यांच्याकडून सन २०२३-२४ साठी कंत्राटी सुरक्षा अधिकारी व सुरक्षा रक्षक घेण्यासाठी पूर्वीच्याच सेवाशर्ती व सेवाशुल्कनुसार त्यांनाच तांत्रिक खंड देवून प्रथमत: ई-निविदाच्या नियमावलीमध्ये नमूद केल्याप्रमाणे Security Deposit (अनामत रक्कम) भरुन घेऊन व करारनामा करुन तद्नंतर पुढील अकरा महिन्यासाठी स्वतंत्र पुरवठा आदेश देण्याबाबत आस्थापना विभागाकडून दि.२७/०९/२०२३ रोजी मा. कुलगुरु महोदय यांच्याकडे प्रशासकीय टिपणी सादर करण्यात आली होती. सदर टिपणीवर मा.कुलगुरु महोदय यांच्याकडून ***"@ सहमत नाही नवीन प्रक्रिया सुरु करावी तोपर्यंत सध्याची कंपनी Continue करावी. MC ला माहितीस्तव ठेवावे."*** असे आदेश प्राप्त झालेले आहेत.<br>उपरोक्त प्राप्त आदेशाच्या अनुषंगाने प्रस्तुत विद्यापीठास सन २०२३-२४ साठी कंत्राटी सुरक्षा अधिकारी व सुरक्षा रक्षक खासगी कंत्राटदारामार्फत ई-निविदाची प्रक्रिया राबवून घेण्यासाठी ई-निविदाची प्रक्रिया वित्त व लेखा | आस्थापना विभाग |

(खरेदी व भांडार) विभागाकडून सुरु करण्याबाबत दि.१०/१०/२०२३ रोजीच्या टिपणीन्वये प्रशासकीय मान्यता घेऊन पुढील कार्यवाही करण्याबाबत दि.१८/१०/२०२३ च्या अंतर्गत कार्यालयीन टिपणीन्वये वित्त व लेखा (खरेदी व भांडार) विभागासकळविण्यात आलेले आहे व ई-निविदेची प्रक्रिया सुरु करण्यात आली असल्याने सद्यस्थितीत प्रस्तुत विद्यापीठास सुरक्षेच्या कामासाठी कंत्राटी पध्दतीने सुरक्षा अधिकारी व सुरक्षा रक्षक पुरवठा करणारे कंत्राटदार मे.अभिजित इंटेलिजन्स सिक्युरिटी ॲन्ड लेबर सप्लायर, नागपूर यांना दि.०४/११/२०२३ पासून ई-निविदेची प्रक्रिया पूर्ण होऊन नविन कंत्राटदार नियुक्त होईपर्यंतच्या कालावधीसाठी पूर्वीच्याच सेवाशर्ती व सेवाशुल्कनुसार मुदत वाढ दिल्याबाबत दि.०२/११/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

सबब, प्रस्तुत विद्यापीठास सन २०२३-२४ साठी कंत्राटी सुरक्षा अधिकारी व सुरक्षा रक्षक खासगी कंत्राटदारामार्फत ई-निविदाची प्रक्रिया राबवून घेण्यासाठी ई-निविदाची प्रक्रिया वित्त व लेखा (खरेदी व भांडार) विभागाकडून सुरु केल्याची बाब व सद्यस्थितीत प्रस्तुत विद्यापीठास सुरक्षेच्या कामासाठी कंत्राटी पध्दतीने सुरक्षा अधिकारी व सुरक्षा रक्षक पुरवठा करणारे कंत्राटदार मे. अभिजित इंटेलिजन्स सिक्युरिटी ॲन्ड लेबर सप्लायर, नागपूर यांना कंत्राटी सुरक्षा रक्षक पुरवठा करण्याबाबत देण्यात आलेल्या पुरवठा आदेशाची मुदत दि.०३/११/२०२३ रोजी अंतिम असल्याने व ई-निविदेची प्रक्रिया सुरु असल्याने दि.०४/११/२०२३ पासून ई-निविदेची प्रक्रिया पूर्ण होऊन नविन कंत्राटदार नियुक्त होईपर्यंतच्या कालावधीसाठी पूर्वीच्याच सेवाशर्ती व सेवाशुल्कनुसार मुदत वाढ देण्यात आल्याची बाब माहितीस्तव.

ठराव: **प्रस्तुत विद्यापीठास सन २०२३-२४ साठी कंत्राटी सुरक्षा अधिकारी व सुरक्षा रक्षक खासगी कंत्राटदारामार्फत ई-निविदाची प्रक्रिया राबवून घेण्यासाठी ई-निविदाची प्रक्रिया वित्त व लेखा (खरेदी व भांडार) विभागाकडून सुरु केल्याची बाब व सद्यस्थितीत प्रस्तुत विद्यापीठास सुरक्षेच्या कामासाठी कंत्राटी पध्दतीने सुरक्षा अधिकारी व सुरक्षा रक्षक पुरवठा करणारे कंत्राटदार मे. अभिजित इंटेलिजन्स सिक्युरिटी ॲन्ड लेबर सप्लायर, नागपूर यांना कंत्राटी सुरक्षा रक्षक पुरवठा करण्याबाबत देण्यात आलेल्या पुरवठा आदेशाची मुदत दि.०३/११/२०२३ रोजी अंतिम असल्याने व ई-निविदेची प्रक्रिया सुरु असल्याने दि.०४/११/२०२३ पासून ई-निविदेची प्रक्रिया पूर्ण होऊन नविन कंत्राटदार नियुक्त होईपर्यंतच्या कालावधीसाठी पूर्वीच्याच सेवाशर्ती व सेवाशुल्कनुसार मुदत वाढ देण्यात आल्याबाबतची नोंद घेण्यात आली.**

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [०४] | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५ (२) (ड) मधील तरतुदीनुसार संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करावयाची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठास मंजूर असलेल्या संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ या पदावर कार्यरत असलेले डॉ. शिवकुमार सुगण्णा गणपूर हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याने त्यांना दि.३१/०७/२०२३ रोजी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ या पदावरुन सेवामुक्त करण्यात आले होते. त्यामुळे सदर पद दि.०१/०८/२०२३ पासून रिक्त आहे.<br>डॉ. शिवकुमार सुगण्णा गणपूर यांच्या सेवानिवृत्तीने रिक्त झालेल्या संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ या पदाची जाहिरात दै. लोकमत, दै. पुढारी च्या दि.०५/०९/२०२३ रोजीच्या आवृत्तीमध्ये, दै. लोकसत्ता (एक्सप्रेस करिअर वेस्ट पॅकेज) च्या साप्ताहिकेत, Association of Indian Universities, New Delhi यांच्या आवृत्तीमध्ये तसेच प्रस्तुत विद्यापीठाच्या su.digitaluniversity.ac व महाराष्ट्र शासनाच्या Maharashtra.gov.in संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आली होती.<br>सदर जाहिरातीस अनुसरुन विहीत कार्यवाही करुन संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ या पदासाठी प्राप्त होणाऱ्या आवेदनपत्रांमधून पात्र ठरणाऱ्या उमेदवरांची मुलाखत घ्यावी लागणार आहे. सदर मुलाखती घेण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५(२) (ड) मधील तरतुदीनुसार निवड समिती गठीत करावी लागणार आहे. सदर निवड समितीला अनुसरुन १०५ (२) (ड) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद विहीत केलेली आहे.<br>• व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाचा, व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक निर्वाचित प्राचार्य किंवा अध्यापक<br>उपरोक्त तरतुदीच्या अनुषंगाने संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक निर्वाचित प्राचार्य किंवा अध्यापक यांचे व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करणे आवश्यक आहे.<br>सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५ (२)(ड) मधील तरतुदीनुसार संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करावयाची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५ (२) (ड) मधील तरतुदीनुसार संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेने डॉ. सुशिल कुमार शिंदे यांचे सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.**<br>**सदर विषयाची चर्चा सुरु करण्यापूर्वी डॉ. मलिक सगाजी रोकडे, प्रभारी संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ हे सदर पदासाठी स्वत: उमेदवार असल्याने या विषयाबाबतच्या चर्चेदरम्यान अनुपस्थित होते.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [०५] | **विद्यापीठ परिसर संकुलात स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे अध्यासन केंद्र आणि डॉ. सुशिलकुमार शिंदे Democratic Leadership Development Centre सुरु करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: सभा व निवडणूका विभागाच्या दि.१८/०९/२०२३ रोजीच्या सादरीकरणान्वये कळविण्यात आले आहे की, अधिसभेची बैठक दि.२८ जुलै, २०२३ रोजी संपन्न झाली असून, सदर बैठकीमध्ये ॲड. उषा नंदकुमार पवार व श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे यांनी खालीलप्रमाणे सूचना पाठविली होती.<br>१) ॲड. उषा नंदकुमार पवार यांनी ठराव क्र.१२ नुसार खालीलप्रमाणे सूचना पाठविली होती.<br>प्रस्तुत विद्यापीठामध्ये नव्याने बांधण्यात आलेल्या क्रीडा संकुलास "स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे क्रीडा संकुल" असे नाव देण्यात यावे अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेस करीत आहे. सदर ठरावावर अनौपचारिक चर्चा करण्यात आली. चर्चेअंती मा. प्रभारी कुलगुरु यांनी "स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे अध्यासन केंद्र" सुरु करण्याबाबत शासनास प्रस्ताव पाठविण्यात येईल असे सूचित केले होते. त्यानुसार ॲड. उषा नंदकुमार पवार यांनी सदरचा ठराव मागे घेण्याबाबत सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली.<br>२) श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे यांनी ठराव क्र.१४ नुसार खालीलप्रमाणे सूचना पाठविली होती.<br>प्रस्तुत विद्यापीठामध्ये नव्याने बांधण्यात आलेल्या मुख्य इमारतीस "माजी मुख्यमंत्री डॉ. सुशिलकुमार शिंदे प्रशासकीय भवन" असे नाव देण्यात यावे अशी शिफारस ही अधिसभा व्यवस्थापन परिषदेकडे करीत आहे. सदर ठरावावर अनौपचारिक चर्चा करण्यात आली. चर्चेअंती डॉ. सुशिलकुमार शिंदे यांच्या नावाने Democratic Leadership Development Centre विद्यापीठमध्ये सुरु करण्याची कार्यवाही करण्यात यावी त्यानुसार श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे यांनी सदरचा ठराव मागे घेण्याबाबत सभागृहाकडे परवानगी मागितली व सभागृहाने एकमताने परवानगी दिली. | आस्थापना विभाग |

३) दि.१८ सप्टेंबर, २०२३ चे शासानाचे पत्र: सदर पत्रान्वये शासनाने येथून पुढे अध्यासन केंद्र सुरु करावयाचे असल्यास विद्यापीठ निधीतून सुरु करण्यात यावे शासन कसल्याही प्रकारचे अनुदान देणार नाही असे कळविले आहे.

सबब, मा. अधिसभा सदस्य श्रीमती ॲड. उषा नंदकुमार पवार आणि श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे यांनी सुचविल्याप्रमाणे स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे अध्यासन केंद्र आणि डॉ. सुशिलकुमार शिंदे Democratic leadership Development Centre विद्यापीठात सुरु करण्याबाबतची बाब विचारार्थ.

**ठराव:** विद्यापीठ परिसर संकुलात स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे अध्यासन केंद्र आणि डॉ. सुशिलकुमार शिंदे Democratic Leadership Development Center (Research Center) सुरु करण्यास मान्यता देण्यात आली व खालीलप्रमाणे मसूदा समिती गठीत करण्यात आली.

स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे संशोधन केंद्र मसूदा समिती

| | | |
|---|---|---|
| १) | श्री. सचिन मारुती गायकवाड | अध्यक्ष |
| २) | ॲड. उषा नंदकुमार पवार | सदस्या |
| ३) | श्री. संजय नामदेव साळुंखे | सदस्य |
| ४) | श्रीमती अस्मिता गायकवाड | सदस्या |
| ५) | श्री. संभाजी राजे शिंदे | सदस्य |

डॉ. सुशिलकुमार शिंदे Democratic Leadership Development Centre (Reserch Center)

| | | |
|---|---|---|
| १) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | अध्यक्ष |
| २) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य |
| ३) | श्री. गणेश दत्तात्रय डोंगरे | सदस्य |
| ४) | श्री. चेतन नरोटे | सदस्य |
| ५) | (अध्यक्ष सुचवतील त्याप्रमाणे) | सदस्य |

तसेच आत्तापर्यंतच्या सर्व प्रस्तावित अध्यासन केंद्रासाठी Corpos Fund गोळा करणे आवश्यक आहे. तसेच Research Center करीता वेगवेगळे प्रस्ताव करुन शासनाकडे स्वतंत्रपणे पाठविता येतील याकरीता खालीलप्रमाणे Core Committee गठीत करण्याचे सर्वानुमते ठरले.

Core Committee

| | | |
|---|---|---|
| १) | डॉ. लक्ष्मीकांत बसवराज दामा, प्र-कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य |
| ३) | शासनाकडे सादर करणेकामी प्रक्रिया सुरु असलेल्या सर्व प्रस्तावित अध्यासन/संशोधन केंद्रांचे अध्यक्ष | सदस्य |

या व याआधीच्या सर्व मसूदा समित्यांनी अध्यासन केंद्राचा / संशोधन केंद्राचा मसूदा दि.२७ जानेवारी, २०२४ पर्यंत तयार करुन मा. प्र-कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखालील Core Committee कडे सादर करावा असे सर्वानुमते ठरले.

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ ०६ ]</td><td>सन २०२३-२४ पासून कमवा व शिका योजनेअंतर्गत काम करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रति तास रु.४०/- ऐवजी रु.५०/- अशी वाढ करण्याची बाब विचारार्थ.<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठात कमवा व शिका योजना राबविण्यात येते. सदर योजनेखाली प्रथम व द्वितीय वर्षातील १०९ विद्यार्थी सदर योजनेत सहभागी करुन घेण्यात आले आहेत. सदर योजनेची प्रभावी अंमलबजावणी करणे तसेच आर्थिक तरतुदी संदर्भातले धोरण आणि एकूणच अधिकाधिक गरजू विद्यार्थ्यांना या योजनेचा जास्तीत जास्त लाभ व्हावा यासाठी सदरील योजनेची पुर्नरचना करण्यासाठी मा. कुलगुरु महोदय यांच्याकडून नामनिर्देशित समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीच्या बैठकीतील ठरावानुसार खालीलप्रमाणे शिफारस करण्यात आली आहे.<br>"कमवा व शिका या योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना प्रति तास रु.४०/- मानधन देण्यात येतात. परंतु इतर विद्यापीठात कमवा व शिका योजनेअंतर्गत देण्यात येणारे मानधन आणि वाढती महागाई विचारात घेता प्रति तास रु.१०/- वाढ करुन रु.५०/- देण्याची शिफारस करण्याचे सर्वानुमते ठरले."<br>सबब, सदर ठरावानुसार कमवा व शिका योजनेअंतर्गत काम करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रति तास रु.४०/- ऐवजी रु.५०/- अशी वाढ करण्याची बाब विचारार्थ.</td><td>विद्यार्थी विकास विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>सन २०२३-२४ पासून कमवा व शिका योजनेअंतर्गत काम करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रति तास रु.४०/- ऐवजी रु.६०/- अशी वाढ करण्यास व जेवढे कामाचे तास होतील त्याप्रमाणात मानधन देय राहील असे सर्वानुमते ठरले.<br>तसेच "कमवा व शिका" या योजनेअंतर्गत कामाचे स्वरुप व नियमावली तयार करण्याकरीता खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>सदस्यांचे नाव</th><th>पद</th></tr>
<tr><td>१</td><td>योगिनी घारे, कुलसचिव</td><td>अध्यक्ष</td></tr>
<tr><td>२</td><td>प्रा. (डॉ.) बाळकृष्ण जगन्नाथ लोखंडे</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>३</td><td>डॉ. समाधान दिगंबर पवार</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>४</td><td>डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>५</td><td>श्री. सचिन मारुती गायकवाड</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>६</td><td>डॉ. केदारनाथ लक्ष्मण काळवणे,<br>संचालक, विद्यार्थी विकास मंडळ</td><td>सदस्य / सचिव</td></tr>
</table>
वरील समितीने दि.२७ जानेवारी, २०२४ पर्यंत अहवाल सादर करावा असे सर्वानुमते ठरले. त्याचप्रमाणे भविष्यात विद्यार्थ्यांची मेस सहकार तत्वावर चालविण्यासाठी मुलांना प्रोत्साहन देणे, Senstise करणे यासाठी संचालक, विद्यार्थी विकास मंडळ आणि संचालक, राष्ट्रीय सेवा योजना यांनी विशेष प्रयत्न करावे असेही ठरले.</td><td></td></tr>
</table>

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०७ ] | **सन २०२३-२४ या वर्षासाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा अपघाती विमा उतरविण्याची बाब विचारार्थ.** | विद्यार्थी विकास विभाग |

टिपणी: २०२३-२४ या वर्षात विद्यापीठ व महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थी व त्याचे एक कमावते पालक, शिक्षक प्रशासकीय कर्मचारी यांचा विमा उतरविण्यासाठी निविदा मागविण्याबाबत प्रस्ताव वित्त व लेखा विभागाच्या (खरेदी व भांडार) विभागाकडे पाठविण्यात आला होता. त्यास अनुसरुन वित्त व लेखा विभागाकडून प्राप्त झालेला तौलनिक तक्ता विचारात घेता L१ असलेले श्रीराम जनरल इंन्सुरंन्स कंपनी लि. जयपुर यांचे विद्यार्थ्यासाठी रु.१४७/- व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासाठी रु.२३६/- इतके दर मान्य करण्यात आले होते.

परंतु सन २०१७-१८ या वर्षात श्रीराम जनरल इंन्सुरंन्स कंपनी लि. जयपुर यांच्या विरोधात रुपाली केशव पुजारी सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव, सोलापूर यांचा दि.०२/०८/२०१८ रोजी झालेल्या अपघाती मृत्युती केस क्र.२१/२ जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, सोलापूर यांच्याकडे तक्रार दाखल केली असून क्लेमबाबत तक्रार न्यायप्रविष्ठ आहे. त्यास अनुसरुन सदर बाब दि.०४/०९/२०२३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर केली असता खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला आहे.

ठराव: सखोल चर्चेअंती विद्यार्थी व त्याचे पालक आणि शिक्षक प्रशासकीय कर्मचारी या दोघासाठी न्युनतम दर असलेले L१ मे. श्रीराम जनरल इंन्सुरंन्स कंपनी लि., जयपुर यांच्यासोबत न्यायालयीन प्रकरण अद्याप सुरु असल्याने जे फर्म L२ आहेत त्यांना सन २०२३-२४ या वर्षासाठीचा विमा उतरविण्यासंबंधी खालीलप्रमाणे पुरवठा आदेश देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

| | | | |
|---|---|---|---|
| विद्यार्थी व त्याचे पालक | ₹१६०.०१/- | M/s TATA AIG GENRAL INSURANCE COMPANY LIMITED, SOLAPUR | L2 |
| शिक्षक प्रशासकीय कर्मचारी | ₹२६०.०१/- | M/s THE ORINTAL INSURANCE COMPANY LIMITED, MUMBAI | L2 |

परंतु शिक्षक प्रशासकीय कर्मचारी यांचा विमा उतरविण्याबाबत करार करण्यासाठी मे. दि ओरीएन्टल इंन्सुरंन्स कं. लि, ठाणे यांच्याशी चर्चा करण्यात आली व संबंधीतांना पत्रान्वये कराराच्या मसुद्यावर चर्चा करण्यासाठी दि.११/०९/२०२३ रोजी प्रस्तुत विद्यापीठात उपस्थित राहण्याबाबत कळविण्यात आले होते. परंतु मे. दि ओरीएन्टल कं. लि, ठाणे यांनी मेलद्वारे "We refer to your mail regarding the Teaching & non-teaching staff employees◦ insurance,

we would regret to infrom you that our Competitive Authority has not allowed to issue the policy for only Teaching & non-teaching staff employees" असे कळविले होते. L३ असलेली M/s TATA AIG GENRAL INSURANCE COMPANY LIMITED, SOLAPUR यांचा दर ₹३७०/- असून त्यांना शिक्षक व प्रशासकीय कर्मचारी यांचा विमा उतरविण्याबाबत चर्चेसाठी बोलविण्याची बाब दि.१५/०९/२०२३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर केला असता, खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला आहे.

| | |
|---|---|
| ठराव: | सन २०२३-२४ या वर्षाकरीता शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा अपघाती विमा उतरविण्यासाठी संबंधीत फर्मसोबत वाटाघाटी करुन पुढील कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. |

उपरोक्त ठरावानुसार M/s TATA AIG GENRAL INSURANCE COMPANY LIMITED, SOLAPUR यांच्यासोबत झालेल्या चर्चेनुसार प्रती कर्मचारी ₹३७०.०१/- ऐवजी ₹३५४/- देण्याचे मान्य असल्याबाबत त्यांनी पत्रान्वये कळविले आहे.

तरी सदर ठरावानुसार प्रती कर्मचारी ₹२०,००,०००/- (अक्षरी रुपये वीस लाख फक्त) इतक्या अपघाती क्लेमसाठी ₹३५४/- इतक्या दराप्रमाणे सन २०२३-२४ या वर्षासाठी M/s TATA AIG GENRAL INSURANCE COMPANY LIMITED, SOLAPUR यांच्यासोबत करार करण्याची व त्यांना कार्यारंभ आदेश देण्याबाबतची कार्यवाही सुरु होती. परंतु सन २०१७-१८ या वर्षात श्रीराम जनरल इंन्सुरंन्स कंपनी लि, जयपुर यांच्या विरोधात रुपाली केशव पुजारी यांचा अपघाती मृत्युची केस क्र.२१/२ जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, सोलापूर यांनी नामंजूर केले असल्याबाबत संबंधीत वकीलांनी कळविले असल्याबाबतचा अभिप्राय कायदा विभागाकडून प्राप्त झाला आहे. तरी दि.०४/०९/२०२३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीतील ठरावात नमुद केल्याप्रमाणे वरील न्यायालयीन प्रकरण संपले असल्याने श्रीराम जनरल इंन्सुरंन्स कंपनी लि, जयपुर यांच्याकडे असलेले प्रकरण आज रोजी न्यायप्रविष्ठ नाही. तरी सदर बाब विचारात घेवून M/s TATA AIG GENRAL INSURANCE COMPANY LIMITED, SOLAPUR यांना कार्यारंभ आदेश देण्याची बाब विचारार्थ.

| | |
|---|---|
| ठराव: | **सन २०२३-२४ या वर्षासाठी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांचा अपघाती विमा उतरविण्यास M/s TATA AIG GENRAL INSURANCE COMPANY LIMITED, SOLAPUR यांना कार्यारंभ आदेश देण्यास सर्वानुमते ठरले. तसेच कंत्राटी शिक्षक व कंत्राटी कर्मचारी यांचाही अपघाती विमा उतरविण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.** |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [०८] | **शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये विविध संलग्नित महाविद्यालयांना आणि विद्यापीठ परिसर संकुलांना अभ्यासक्रमावर आधारित चर्चासत्र/कार्यशाळा आयोजनाकरिता आर्थिक सहाय्य करणेसंदर्भात शिफारस करणेकरिता मा. कुलगुरु महोदयांनी गठीत केलेल्या समितीची बैठक दि.०६/१२/२०२३ रोजी आयोजित करण्यात आली होती, सदर समितीने प्राप्त प्रस्तावांची छाननी/पडताळणी करुन सादर केलेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठातंर्गत सर्व संलग्नित महाविद्यालये व संकुलाकडून आंतरराष्ट्रीय/राष्ट्रीय /राज्य/विभागीय व विद्यापीठ पातळीवर अभ्यासक्रमावर आधारित चर्चासत्र, कार्यशाळा व परिषदा आयोजनाकरिता प्रतिवर्षी प्रस्ताव मागविण्यात येतात. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये आंतरराष्ट्रीय/ राष्ट्रीय/राज्य व विभागीय पातळीवर चर्चासत्र, कार्यशाळा, परिषद (Seminar, Workshop & Conference) आयोजनाबाबत व त्याकरिता होणाऱ्या खर्चापोटी विद्यापीठ नियमानुसार काही अंशी आर्थिक सहाय्य अनुदान रक्कम देणेकरिता विद्यापीठ पत्र क्र. पुअहोसोविसो/अमंवि/२०२३/७१०४ दि. ३०/०९/२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्रस्तुत विद्यापीठ संलग्न महाविद्यालये व संकुलाकडून विहित मुदतीत दि.१२/१०/२०२३ पर्यंत दिलेल्या नमुन्यात प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्यानुसार विहित मुदतीत ११५ प्रस्ताव व मुदतीनंतर १५ प्रस्ताव असे एकूण १३० प्रस्ताव विद्यापीठास प्राप्त झाले आहेत.<br>उपरोक्त प्रस्तावांची छाननी करण्यासाठी पात्र महाविद्यालये व संकुलाना अनुदान सहाय्य रक्कम आदा करण्यासाठी मा. कुलगुरु महोदया यांनी अभ्यासमंडळे विभागाच्या दि.०४/११/२०२३ रोजीच्या टिपणीवर नामनिर्देशन केल्यानुसार समिती गठीत करण्यात आली होती. सदर समितीची बैठक दि.०६/१२/२०२३ रोजी विद्यापीठ कार्यालयात आयोजित करण्यात आली होती.<br>उपरोक्त समितीने एकूण १३० प्रस्तावांची छाननी/पडताळणी केली असता त्यापैकी ३३ पात्र प्रस्तावांना आर्थिक सहाय्य रक्कम देण्याकरिता शिफारस केलेली असून ९७ प्रस्ताव अनुदान सहाय्य देणेसाठी अपात्र करुन यादी कार्यालयास सादर केली आहे. सदर बैठकीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या सुलभ संदर्भासाठी सोबत जोडला आहे. | अभ्यासमंडळे विभाग |

| | | |
|---|---|---|
| | सबब, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये विविध संलग्नित महाविद्यालयांना आणि विद्यापीठ परिसर संकुलांना अभ्यासक्रमावर आधारित चर्चासत्र/ कार्यशाळा आयोजनाकरिता आर्थिक सहाय्य करणेसंदर्भात शिफारस करणेकरिता मा. कुलगुरु महोदयांनी गठीत केलेल्या समितीची बैठक दि.०६/१२/२०२३ रोजी आयोजित करण्यात आली होती, सदर समितीने प्राप्त प्रस्तावांची छाननी/पडताळणी करुन सादर केलेल्या बैठकीचा कार्यवृत्तांत विचारार्थ. | |
| ठराव: | **शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये विविध संलग्नित महाविद्यालयांना आणि विद्यापीठ परिसर संकुलांना अभ्यासक्रमावर आधारित चर्चासत्र/कार्यशाळा आयोजनाकरिता आर्थिक सहाय्य करणेसंदर्भात शिफारस करणेकरिता मा.कुलगुरु महोदयांनी गठीत केलेल्या समितीची बैठक दि.०६/१२/२०२३ रोजी आयोजित करण्यात आली होती, सदर समितीने प्राप्त प्रस्तावांची छाननी/पडताळणी करुन सादर केलेल्या बैठकीचा कार्यवृत्तांतास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०९ ] | **विद्यापीठ परिसरात सीसीटिव्ही बसविणे या कामासाठी धोरण निश्चित करणेकामी गठीत करण्यात आलेल्या समितीचा प्राप्त अहवाल विचारार्थ.**<br>टिपणी: दि.२६/०६/२०२३ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या तातडीच्या बैठकीत ठराव क्र.३५(०७) अन्वये खालीलप्रमाणे ठराव करण्यात आला.<br>ठराव: सर्व संवैधानिक अधिकारी यांच्या कक्षेतील सीसीटिव्ही कॅमेराचा Screen View बंद करणे व विद्यापीठ परिसरात विविध ठिकाणी सीसीटिव्ही बसविणे या कामासाठी धोरण निश्चित करण्याबाबत समिती गठीत करण्याचे सर्वाधिकार मा. कुलगुरु महोदय यांना सर्वानुमते देण्यात आले.<br>उक्त नमूद ठरावाप्रमाणे मा. कुलगुरु महोदयांनी डॉ. आर. एस. मेंते यांच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत केली होती. सदर समितीने आपला अहवाल दि.२६/१०/२०२३ रोजी विद्यापीठ कार्यालयास सादर केला आहे.<br>सबब, विद्यापीठ परिसरात सीसीटिव्ही बसविणे या कामासाठी धोरण निश्चित करणेकामी गठीत करण्यात आलेल्या समितीचा प्राप्त अहवाल विचारार्थ. | अभियांत्रिकी विभाग |
| ठराव: | **विद्यापीठ परिसरात सीसीटिव्ही बसविणे या कामासाठी धोरण निश्चित करणेकामी गठीत करण्यात आलेल्या समितीचा प्राप्त अहवाल स्विकारुन त्यावर अभ्यास करण्यासाठी खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.**<br>१) योगिनी घारे, कुलसचिव - अध्यक्ष<br>२) प्रा.डॉ. बी. जे. लोखंडे, संचालक, पदार्थ विज्ञान संकुल - सदस्य<br>३) डॉ. श्रीमती ए. एस. लावंड -सदस्या<br>प्रभारी संचालक, रसायनशास्त्र संकूल व तंत्रज्ञान सकुल<br>४) प्रा.डॉ. व्ही. बी. घुटे - सदस्य<br>संचालक, संगणकशास्त्र संकूल व आरोग्यविज्ञान संकुल<br>५) प्रा. डॉ. जी. एस. कांबळे, संचालक, सामाजिकशास्त्रे संकूल - सदस्य<br>६) डॉ. व्ही. पी. धुळप, प्रभारी संचालक, भूशास्त्र संकूल - सदस्य<br>७) डॉ. आर. एस. मेंते, प्रभारी संचालक, वाणिज्य व व्यवस्थापन संकूल - सदस्य<br>८) डॉ. के. आय. काळवणे, प्रभारी संचालक, भाषा व वाङमय संकूल - सदस्य<br>९) प्रा. डॉ. व्ही. बी. पाटील, संचालक, जैवविज्ञान संकुल - सदस्य<br>१०) सौ. डॉ.एम. जे. पाटील - सदस्य<br>प्रभारी संचालक, कला व ललित कला सकुल<br>११) डॉ. मकरंद कुलकर्णी - सदस्य<br>सायंटिफिक इन्स्टूमेंट एक्सपर्ट, इन्स्टुमेंटेशन सेंटर, पुअहोसोविसो<br>१२) श्री. जी. ए. कुलकर्णी, विद्यापीठ अभियंता - सदस्य/सचिव<br>**सदर समितीमधील संकुल संचालकांनी आपापल्या संकुलातील व विद्यापीठ अभियंता यांनी परिसरातील सीसीटिव्हींच्या आवश्यकतांचा अभ्यास करुन लवकरात लवकर अहवाल द्यावा असे ठरले.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १० ] | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १३४ (७) नुसार, निधीच्या जमा खाती असलेली अतिरिक्त रक्कम, शिल्लक निधी इ. बाबत समान लेखा संहिता २०१२ मधील कलम १.६८ ते १.७२ नुसार गुंतवणूक आराखाडा / धोरण ठरविण्याबाबत गठीत गुंतवणूक समितीचा अहवाल मान्यतेसाठी विचारार्थ.**<br>टिपणी: उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे दि.२७/०३/२०१२ रोजीच्या शासन निर्णयान्वये महाराष्ट्र राज्यातील सर्व अकृषी विद्यापीठसाठी दि.०१/०४/२०१२ पासून समान लेखा संहिता (Common Account Code) लागू करण्यात आले आहे.<br>समान लेखा संहिता (Common Account Code) मधील कलम १.६८ ते १.७२ नुसार वित्त व लेखा समितीने नामनिर्देशित केलेली गुंतवणूक समिती, गुंतवणूक आराखाडा / धोरण निश्चित करेल व ते आराखाडा / धोरण वित्त व लेखा समिती व व्यवस्थापन परिषद यांच्या मान्यतेने अंतिम करुन त्यानुसार वित्त व लेखाधिकारी सदर गुंतवणूक प्रक्रिया मा.कुलगुरु यांच्या मान्यतेने पूर्ण करेल. त्यानुसार यापूर्वी दि.०९/१०/२०१२ रोजीची वित्त व लेखा समिती ठराव क्र. ०३ व दि.१६/१०/२०१२ रोजीची व्यवस्थापन परिषद ठराव क्र.१९ यांच्या मान्यतेन्वये गुंतवणूक आराखाडा / धोरण निश्चित करण्यात आले होते. व त्याप्रमाणे खाती असलेली अतिरिक्त रक्कम, शिल्लक निधी व देणग्या इ. ची गुंतवणूक समान लेखा संहिता कलम १.७२ व विद्यापीठ कायदा, १९९४ मधील कलम १०२ (७) नुसार जास्तीत जास्त व्याज देणाऱ्या राष्ट्रीयकृत / शेडयुल्ड बँकेत करण्यात येत होती.<br>मा.कुलगुरु यांनी सदर गुंतवणूक आराखाडा / धोरण सुधारित करणेबाबत निर्देशित केले आहे. सदर धोरण निश्चित करण्यासाठी समान लेखा संहिता २०१२ मधील कलम १.६८ नुसार वित्त व लेखा समितीच्या बैठकीत गुंतवणूक उपसमिती नामनिर्देशित करणे आवश्यक आहे. सदर समिती समान लेखा संहिता २०१२ व महाराष्ट्र विद्यापीठ सार्वजनिक अधिनियम, २०१६ मधील या संदर्भात लागू असलेल्या विविध तरतूदीचे पालन करुन गुंतवणूक आराखाडा / धोरण तयार करेल व वित्त व लेखा समिती आणि व्यवस्थापन परिषदेच्या अंतिम मान्यतेसाठी सादर करेल.<br>सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १३४(७) नुसार, निधीच्या जमा खाती असलेली अतिरिक्त रक्कम, शिल्लक निधी इ. बाबत समान लेखा संहिता २०१२ मधील कलम १.६८ ते १.७२ नुसार गुंतवणूक आराखाडा / धोरण ठरविण्याबाबत गुंतवणूक उपसमिती गठीत करण्यासाठी दि.१०/१०/२०२३ रोजीच्या वित्त व लेखा समितीच्या बैठकीमध्ये ठराव क्र. ३(१) अन्वये खालीलप्रमाणे समिती सदस्याचे नामनिर्देशन करण्यात आलेले आहे.<br>महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १३४ (७) नुसार, निधीच्या जमा खाती असलेली अतिरिक्त रक्कम, शिल्लक निधी इ. बाबत समान लेखा संहिता २०१२ मधील कलम १.६८ ते १.७२ नुसार गुंतवणूक आराखाडा / धोरण ठरविण्याबाबत पुर्नलोकन करण्यासाठी खालीलप्रमाणे गुंतवणूक उपसमिती गठीत करण्यास मान्यता देण्यात आली. | वित्त व लेखा विभाग |

| अ. क्र. | सदस्यांचे नांव | पदनाम | समिती अध्यक्ष / सदस्य |
|---|---|---|---|
| १ | मा. प्रा. डॉ. प्रकाश महानवर | कुलगुरु | अध्यक्ष |
| २ | मा. प्रा. देवानंद चिलवंत | व्यवस्थापन परिषद सदस्य | सदस्य |
| ३ | मा. डॉ. समाधान पवार | व्यवस्थापन परिषद सदस्य | सदस्य |
| ४ | श्रीमती योगिनी घारे | कुलसचिव | सदस्य |
| ५ | डॉ. जे. के. मुल्ला | अधिसभा सदस्य | सदस्य |
| ६ | सीए श्रेणिक शाह | वित्त व लेखाधिकारी | सदस्य सचिव |

उपरोक्त समितीची बैठक दि.०८/११/२०२३ रोजी घेण्यात आली सदर बैठकीमध्ये महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १३४ (७) नुसार, निधीच्या जमा खाती असलेली अतिरिक्त रक्कम, शिल्लक निधी इ. बाबत समान लेखा संहिता २०१२ मधील कलम १.६८ ते १.७२ नुसार गुंतवणूक आराखाडा / धोरण ठरविण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. चर्चेअंती खालीलप्रमाणे गुंतवणूक आराखाडा निश्चित करण्यास शिफारस करण्यात आली.

ठराव:

१. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १३४ (७) मध्ये नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करणे.

२. गुंतवणूकीची सर्व कार्यवाही समान लेखा संहितेमधील कलम १.७२ प्रमाणे करणे.

सबब, उपरोक्त ठरावाप्रमाणे गुंतवणूक आराखाडा/धोरण निश्चित करण्यासाठी गुंतवणूक उपसमितीने केलेली शिफारस वित्त व लेखा समितीच्या मान्यतेसाठी विचारार्थ.

ठराव: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १३४ (७) नुसार, निधीच्या जमा खाती असलेली अतिरिक्त रक्कम, शिल्लक निधी इ. बाबत समान लेखा संहिता २०१२ मधील कलम १.६८ ते १.७२ नुसार गुंतवणूक आराखाडा / धोरण ठरविण्याबाबत गठीत गुंतवणूक समितीचा अहवाल स्विकारुन त्यानुसार गुंतवणूकीची कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता देवून व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.

सबब, उपरोक्त दि.१०/१०/२०२३ रोजीच्या ठराव क्र. ०३ (१) प्रमाणे वित्त व लेखा समितीने केलेला ठराव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.

**ठराव:** **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम १३४ (७) नुसार, निधीच्या जमा खाती असलेली अतिरिक्त रक्कम, शिल्लक निधी इ. बाबत समान लेखा संहिता २०१२ मधील कलम १.६८ ते १.७२ नुसार गुंतवणूक आराखाडा / धोरण ठरविण्याबाबत गठीत गुंतवणूक समितीचा अहवाल स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
| --- | --- | --- |
| [ ११ ] | **अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयाकडे शिल्लक राहणाऱ्या अनामत रकमेचा विनियोग करणेबाबत**<br>**संदर्भ. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई यांचा शासन निर्णय क्रमांक: संकीर्ण २०२३/प्र.क्र. ११९/वि शि ५ दि.१३/१०/२०२३**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठ परिसरातील विविध संकुलामध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांकडून ग्रंथालय, प्रयोगशाळा व वसतिगृह अनामत रक्कमा जमा करुन घेण्यात येतात व त्यांचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर व्यवस्थापन परिषद ठराव क्रमांक २६ (४) दि.२६/०६/२०१३ अन्वये अनामत रक्कम परत करण्यासंदर्भात नियमावलीस मान्यता देण्यात आली. सोबत ठरावाची प्रत जोडली आहे.<br>तथापि, संदर्भिय शासन निर्णयान्वये शिल्लक राहिलेल्या अनामत रक्कमेचा विनियोग करण्याबाबत सूचना निर्गमित केले आहेत. सोबत जोडलेल्या संदर्भिय शासन निर्णयाचे आवलोकन व्हावे. शासन निर्णयात उच्च व तंत्र शिक्षण विभागातंर्गत कार्यरत असलेल्या विद्यापीठे व विद्यापीठांशी संलग्नित महाविद्यालयाकडे प्रवेशाच्या वेळी विद्यार्थ्याकडून अनामत रक्कम जमा करुन घेण्यात येते. विद्यार्थ्याचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर सदर अनामत रक्कम विद्यार्थ्याला परत करणे अभिप्रेत आहे. तथापि, काही कारणास्तव विद्यार्थ्याकडून सदर अनामत रक्कम परत घेतली जात नाही व ती विद्यापीठ / महाविद्यालयाकडे शिल्लक राहते. सदर अखर्चित रक्कम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रयोजनाकरीता वापरावी याबाबत लोक प्रतिनिधीकडन विधानमंडळात वारंवार विविध आयुधांद्वारे प्रश्न उपस्थित करण्यात येतात. सबब सदर अखर्चित अनामत रक्कमेचा विनियोग अकृषी विद्यापीठे / संबंधित महाविद्यालये यांनी कोणत्या बाबींसाठी करावा याबाबत सुचना निर्गमित केलेली आहे. त्यामध्ये विद्यार्थ्याचे शिक्षण पूर्ण झाल्यानंतर प्रमाणपत्राच्या प्रती घेण्यासाठी विद्यापीठात आल्यानंतर सदर विद्यार्थ्याचे अनामत रक्कम परत करण्यात यावे तथापि ज्या विद्यार्थ्यानी उत्तीर्ण झाल्यानंतर दोन वर्षाच्या कालावधीत अनामत रक्कम परत दिली नाही अथवा मागणी केली नाही अशा शिल्लक राहिलेल्या अनामत रक्कमेचा विनियोग खालीलप्रमाणे सूचना दिलेले आहेत.<br>अ. ग्रंथालय पुस्तके<br>ब. प्रयोगशाळा अद्ययावतीकरण<br>क. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण<br>ङ. शिक्षक / शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण<br>उक्त शासननिर्णयातील दिलेल्या सूचना स्किारुन यापुढे त्याप्रमाणे कार्यवाही करण्यास मान्यता मिळण्याची बाब वित्त व लेखा समितीसमोर सादर केले असता खालीलप्रमाणे ठराव करण्यात आलेला आहे.<br>ठराव: उक्त संदर्भिय शासन निर्णयात दिलेल्या सूचना स्विकारुन प्रस्तुत विद्यापीठात शिल्लक राहणाऱ्या अनामत रकमेचा विनियोग सदर सूचनेप्रमाणे करण्यास सर्वानुमते मान्यता देवून व्यवस्थापन परिषदेस शिफारस करण्यात आली.<br>सबब, उपरोक्त दि.०८/११/२०२३ रोजीच्या ठराव क्र. ०२ प्रमाणे वित्त व लेखा समितीने केलेला ठराव व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसाठी विचारार्थ. | वित्त व लेखा विभाग |
| ठराव: | **अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयाकडे शिल्लक राहणाऱ्या अनामत रकमेचा विनियोग करणेबाबतच्या दि.१३/१०/२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार कार्यवाही करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १२ ] | Bachelor of Visual Art Bridge Course (Painting) चा ०१ वर्षाच्या अभ्यासक्रमाचे सैध्दांतिक (Theory) परीक्षेकरीता शुल्क रु.१,२७०/- व प्रात्यक्षिक परीक्षेकरीता शुल्क रु.६३५/- इतके परीक्षा शुल्क आकारण्याची मा. कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ४८(२) अन्वये परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या वतीने केलेली शिफारस विचारार्थ.<br>टिपणी: संचालक, ललितकला व कला संकुल, प्रस्तुत विद्यापीठ यांनी दि.०८/११/२०२३ रोजीच्या अंतर्गत कार्यालयीन टिपणी अन्वये सदर कोर्ससाठी परीक्षा शुल्क हे Master of Visual Arts प्रमाणे थेअरी परीक्षेकरीता रु.१,२७०/- व प्रात्यक्षिक परीक्षेकरीता रु.६३५/- इतके परीक्षा शुल्क आकारण्यात यावे असे कळविले आहे. त्याअनुषंगाने Bachelor of Visual Art Bridge Course (Painting) चा ०१ वर्षाच्या कोर्सच्या अभ्यासक्रमाचे सैध्दांतिक (Theory) परीक्षेकरीता रु.१,२७०/- व प्रात्यक्षिक परीक्षेकरीता रु.६३५/- इतके परीक्षा शुल्क अशी आकारणी करण्याची बाब तातडीची असल्याने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ४८(२) मधील तरतूदीनुसार मा. कुलगुरु महोदयांनी परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या वतीने स्वीकारुन व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस केलेली आहे.<br>सबब, Bachelor of Visual Art Bridge Course (Painting) चा ०१ वर्षाच्या अभ्यासक्रमाचे सैध्दांतिक (Theory) परीक्षेकरीता शुल्क रु.१,२७०/- व प्रात्यक्षिक परीक्षेकरीता शुल्क रु.६३५/- इतके परीक्षा शुल्क आकारण्याची मा. कुलगुरु महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ४८(२) अन्वये परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या वतीने केलेली शिफारस विचारार्थ. | परीक्षा व मूल्यमापन विभाग |
| ठराव: | **Bachelor of Visual Art Bridge Course (Painting) चा ०१ वर्षाच्या अभ्यासक्रमाचे सैध्दांतिक (Theory) परीक्षेकरीता शुल्क रु.१,२००/- व प्रात्यक्षिक परीक्षेकरीता शुल्क रु.६००/- इतके परीक्षा शुल्क आकारण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १३ ] | **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून नवीन महाविद्यालय सुरू करणेबाबत इरादापत्र मागणाऱ्या संस्थाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची दि.१५/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार विहित कार्यवाही करून पात्र प्रस्ताव महाराष्ट्र शासनास सादर करणेकामी अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाचा शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठीचा बृहत आराखडा दि.०३/०८/२०२३ रोजी महाराष्ट्र शासनास सादर केलेला होता. महाराष्ट्र शासनाने दि.२२/०९/२०२३ च्या पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून नवीन महाविद्यालय सुरू करणेबाबत प्रस्तुत विद्यापीठाच्या बृहत आराखडयातील स्थळबिंदूना मंजूरी दिलेली आहे. या मंजूर झालेल्या स्थळबिंदूप्रमाणे निश्चित झालेल्या ठिकाणाकरिता नवीन महाविद्यालये सुरू करून इच्छिणाऱ्या संस्थाकडून प्रस्ताव मागविणेबाबत विविध वर्तमानपत्रात जाहीर निवेदन प्रसिध्द करून दि.३०/०९/२०२३ पर्यंत प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्याअनुषंगाने विविध संस्थाकडून विद्यापीठाकडे एकूण १० प्रस्ताव प्राप्त झाले होते.<br>दरम्यानच्या कालावधीत दि.२५/१०/२०२३ रोजीच्या शासन पत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून नवीन महाविद्यालये सुरु करू इच्छिणाऱ्या संस्थाकडून प्रस्ताव मागविणेबाबत तारंखामध्ये सुधारणा करून सुधारित तारखा निश्चित केल्यानुसार व शासनाने दि.०३/११/२०२३ पत्रान्वये प्रस्तुत विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून नवीन महाविद्यालये सुरू करणेबाबतच्या स्थळबिंदूना नव्याने मंजूरी दिल्यानुसार प्रस्ताव मागविणेबाबत वर्तमानपत्रात सुधारीत जाहीर निवेदन प्रसिध्द करून दि.१५/११/२०२३ पर्यंत प्रस्ताव मागविण्यात आले होते. त्याअनुषंगाने विविध संस्थाकडून विद्यापीठाकडे एकूण ०४ प्रस्ताव प्राप्त झाले आहेत.<br>उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर दि.१५/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार विहित कार्यवाही करून प्राप्त प्रस्तावांची छाननी करण्याकामी, छाननी समिती गठीत करण्यात आलेली होती.<br>महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि.१५/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. १.८ च्या अनुषंगाने नियुक्त केलेल्या छाननी समितीच्या बैठका दि.१२/१०/२०२३, २५/१०/२०२३, २३/११/२०२३ व | संलग्नता विभाग |

| | | |
|---|---|---|
| | ०५/१२/२०२३ रोजी आयोजित करण्यात आल्या होत्या. त्याचप्रमाणे दि.१५/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. १.१३ च्या अनुषंगाने नवीन महाविद्यालयाच्या स्थळबिंदूच्या प्रत्यक्ष ठिकाणी भेट देवून अहवाल सादर करणेबाबत मा. कुलगुरू महोदयांनी गठित केलेल्या तज्ज्ञ समित्यांचे अहवालाचे विवरणपत्र सोबत जोडले आहे.<br>उपरोक्त प्रमाणे शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून नवीन महाविद्यालय सुरू करणेकामी (इरादापत्रासाठी) विद्यापीठाकडे प्राप्त प्रस्तावांवर दि.१५/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनूसार विहित कार्यवाही करून दि.१६/१२/२०२३ रोजी अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीत सादर केला असता अधिष्ठाता मंडळाने दि.१६/१२/२०२३ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र. ७ (१) अन्वये छाननी समितीचा व तज्ज्ञ समितीचा अहवाल स्विकारून खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.<br>"शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून नवीन महाविद्यालय सुरू करणेबाबत इरादापत्र मागणाऱ्या संस्थाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची दि.१५/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. १.१२ नूसार छाननी समितीचा अहवाल व मुद्दा क्र. १.१३ नूसार तज्ज्ञ समितीचा (Spot Visit) अहवालाची बाब व्यवस्थापन परिषदेकडे सर्वानुमते मान्यतेकरिता शिफारस करण्यात आली. तसेच विवरणपत्र अ. मधील अ.क्र. ९ बाबत निर्णय घेण्याचे अधिकार सर्वानुमते मा. कुलगुरू महोदयांना देण्यात आले."<br>दि.१६/१२/२०२३ रोजीच्या अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीत घेतलेल्या निर्णयानूसार सदरील बाब व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत सादर करावी लागणार आहे.<br>सबब, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून नवीन महाविद्यालय सुरू करणेबाबत इरादापत्र मागणाऱ्या संस्थाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची दि.१५/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार विहित कार्यवाही करून पात्र प्रस्ताव महाराष्ट्र शासनास सादर करणेकामी अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | |
| ठराव: | **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून नवीन महाविद्यालय सुरू करणेबाबत इरादापत्र मागणाऱ्या संस्थाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची दि.१५/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार विहित कार्यवाही करून पात्र प्रस्ताव महाराष्ट्र शासनास सादर करणेकामी अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[ १४ ]</td><td>श्री हनुमान शिक्षण प्रसारक संस्था, माळशिरस संचलित समीर गांधी कला महाविद्यालय, माळशिरस या महाविद्यालयाच्या नावात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून विष्णुपंत कुलकर्णी विज्ञान, वाणिज्य व समीर गांधी कला महाविद्यालय, माळशिरस असा बदल करण्याबाबत अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन मंजूरीकरिता शासनास शिफारस करण्याची बाब विचारार्थ.<br><br>टिपणी: मा. जनरल सेक्रेटरी, श्री हनुमान शिक्षण प्रसारक संस्था, माळशिरस यांच्याकडून संस्थेचे संचलित समीर गांधी कला महाविद्यालय, माळशिरस या महाविद्यालयाच्या नावात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून खालीलप्रमाणे बदल करण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झालेला आहे.<br><br><table><tr><th>संस्थेचे नाव</th><th>महाविद्यालयाचे सद्य:स्थितीतील नाव</th><th>महाविद्यालयाच्या नावातील बदल</th></tr><tr><td>श्री हनुमान शिक्षण प्रसारक संस्था, माळशिरस, जि. सोलापूर.</td><td>समीर गांधी कला महाविद्यालय, माळशिरस, जि.सोलापूर.</td><td>विष्णुपंत कुलकर्णी विज्ञान, वाणिज्य व समीर गांधी कला महाविद्यालय, माळशिरस, जि.सोलापूर.</td></tr></table><br>सदर प्रस्तावात संस्थेच्या दि.१५/१०/२०२३ रोजीच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीमध्ये संस्थेचे संचलित समीर गांधी कला महाविद्यालय, माळशिरस या महाविद्यालयाचे नाव बदलून विष्णुपंत कुलकर्णी विज्ञान, वाणिज्य व समीर गांधी कला महाविद्यालय, माळशिरस असे करणेविषयी सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात आला असल्याने महाविद्यालयाच्या नावात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून उपरोक्त प्रमाणे बदल करुन मिळण्याविषयी विनंती केलेली आहे. सोबत संस्थेच्या दि.१५/१०/२०२३ रोजीच्या कार्यकारी मंडळाच्या बैठकीतील महाविद्यालयाच्या नावातील बदलाबाबतच्या ठराव क्र. २ ची कारणापुरती नक्कल जोडली आहे.<br><br>महाविद्यालयाच्या नावात बदल करण्याबाबतच्या प्राप्त प्रस्तावास प्रथमत: अधिष्ठाता मंडळ, व्यवस्थापन परिषद व तद्नंतर महाराष्ट्र शासनाची मान्यता घेणे आवश्यक आहे.<br><br>यास्तव सदर बाब दि.१६/१२/२०२३ रोजीच्या अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीत विचारार्थ सादर केली असता, अधिष्ठाता मंडळाने ठराव क्र. ६ अन्वये श्री हनुमान शिक्षण प्रसारक संस्था, माळशिरस संचलित समीर गांधी कला महाविद्यालय, माळशिरस या महाविद्यालयाच्या नावात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून विष्णुपंत कुलकर्णी विज्ञान, वाणिज्य व समीर गांधी कला महाविद्यालय, माळशिरस असा बदल करण्याची बाब स्विकारुन व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.<br><br>सबब, श्री हनुमान शिक्षण प्रसारक संस्था, माळशिरस संचलित समीर गांधी कला महाविद्यालय, माळशिरस या महाविद्यालयाच्या नावात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून विष्णुपंत कुलकर्णी विज्ञान, वाणिज्य व समीर गांधी कला महाविद्यालय, माळशिरस असा बदल करण्याबाबत अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन मंजूरीकरिता शासनास शिफारस करण्याची बाब विचारार्थ.</td><td>संलग्नता विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>श्री हनुमान शिक्षण प्रसारक संस्था, माळशिरस संचलित समीर गांधी कला महाविद्यालय, माळशिरस या महाविद्यालयाच्या नावात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून विष्णुपंत कुलकर्णी विज्ञान, वाणिज्य व समीर गांधी कला महाविद्यालय, माळशिरस असा बदल करण्याबाबत अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन मंजूरीकरिता शासनास शिफारस करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.</td><td></td></tr>
</table>

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १५ ] | **"इतिहास व पुरातत्वशास्त्र" या पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास डॉ. माया ज. पाटील यांच्या आई व वडीलांच्या स्मरणार्थ दिल्या जाणाऱ्या सुवर्ण पदकाचे नाव बदलून "प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती आणि पुरातत्वशास्त्र" असे करण्यासाठी नविन डाय तयार करण्यास येणाऱ्या खर्चासाठी विद्यापीठास प्राप्त झालेला धनादेश स्विकारण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठातील सामाजिकशास्त्रे संकुलाकडून प्राप्त झालेल्या पत्रानुसार "इतिहास व पुरातत्वशास्त्र" विभागातंर्गत प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास डॉ. माया ज. पाटील यांच्या आई व वडीलांच्या स्मरणार्थ सन २०१७ पासून सुवर्णपदक दिले जाते. या अभ्यासक्रमाच्या नावामध्ये बदल होवून "प्राचीन भारतीय, इतिहास, संस्कृती आणि पुरातत्वशास्त्र" असे ठेवण्यात आले आहे. त्या संदर्भात विभागाकडून मा. कुलगुरु महोदयांनी दि.०८/०९/२०२३ रोजीच्या सामाजिक शास्त्र संकुलाकडून सादर करण्यात आलेल्या टिपणीस मान्यता दिली आहे.<br>डॉ. माया ज. पाटील यांच्या आई व वडिलांच्या स्मरनार्थ "इतिहास व पुरातत्वशास्त्र" या अभ्यासक्रमामध्ये प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास सुवर्ण पदक दिले जाते. परंतू सदरच्या अभ्यासक्रमाच्या नावामध्ये बदल झाल्याने सुवर्ण पदकावर छापले जानारे नाव बदलने गरजेचे आहे. त्यासाठी नविन नावाचे डाय बनवून घेणे आवश्यक आहे. याबाबत मे. आपटे ट्रेडर्स, चांदीचे व्यापारी यांच्याकडें अंदाजे येणारा खर्चाविषयी विचारणा केली असता ४,१३०/- रू. इतका खर्च अपेक्षीत आहे असे कळविण्यात आले आहे. त्या अनुषंगाने डॉ. माया ज. पाटील यांनी सद्याचा येणाऱा खर्च देण्यास सहमती दिली आहे.<br>"इतिहास व पुरातत्वशास्त्र" या नावाऐवजी "प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती आणि पुरातत्वशास्त्र" अशा नावाचा नविन डाय तयार करूण घेण्यास अभ्यासमंडळे विभागाच्या दि.२०/१०/२०२३ रोजीच्या टिपणीस मान्यता दिली आहे. डॉ. माया ज. पाटील यांनी अंदाजे येणाऱ्या खर्चाचा धनादेश अभ्यासमंडळे विभागाकडे जमा केला असून सदरचा धनादेश स्विकारून तो वित्त व लेखा विभागाकडे रु. ४,१३०/- वर्ग करावा लागणार आहे.<br>सबब, "इतिहास व पुरातत्वशास्त्र" या पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास डॉ. माया ज. पाटील यांच्या आई व वडीलांच्या स्मरणार्थ दिल्या जाणाऱ्या सुवर्ण पदकाचे नाव बदलून "प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती आणि पुरातत्वशास्त्र" असे करण्यासाठी नविन डाय तयार करण्यास येणाऱ्या खर्चासाठी विद्यापीठास प्राप्त झालेला धनादेश स्विकारण्याची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | अभ्यासमंडळे विभाग |
| ठराव: | **"इतिहास व पुरातत्वशास्त्र" या पदव्युत्तर अभ्यासक्रमास प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास डॉ. माया ज. पाटील यांच्या आई व वडीलांच्या स्मरणार्थ दिल्या जाणाऱ्या सुवर्ण पदकाचे नाव बदलून "प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती आणि पुरातत्वशास्त्र" असे करण्यासाठी नविन डाय तयार करण्यास येणाऱ्या खर्चासाठी विद्यापीठास प्राप्त झालेला धनादेश स्विकारण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १६ ] | **"सन २०२१ ते डिसेंबर २०२२ पर्यंत विद्यापीठाच्या रासेयो विभागाने केलेले वृक्षारोपण व त्याचा खर्चाचा अहवाल सादर करण्याची बाब माहितीस्तव.**<br>टिपणी: श्री. सचिन मारूती गायकवाड यांचेकडील दि.१५/१२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये मुद्दा क्र.२ अन्वये सन २०२१ ते डिसेंबर २०२२ पर्यंत विद्यापीठाच्या रासेयो विभागाने केलेले वृक्षारोपण व त्याचा खर्चाचा अहवाल सादर करणेबाबतचा ठराव सभागृहामध्ये ठेवत आहे असा मुद्दा उपस्थित केला आहे.<br>सन २०२१-२२ मध्ये रासेयो अंतर्गत करण्यात आलेल्या वृक्षारोपण व खर्चाचा अहवाल खालीलप्रमाणे सादर करीत आहे.<br>सन २०२१-२२ पर्यंत विद्यापीठाच्या रासेयो विभागाने केलेले वृक्षारोपण व त्याचा खर्चाचा अहवाल निरंक आहे.<br>सबब, सदरची बाब माहितीस्तव. | राष्ट्रीय सेवा योजना विभाग |
| ठराव: | **"सन २०२१ ते डिसेंबर २०२२ पर्यंत विद्यापीठाच्या रासेयो विभागाने वृक्षारोपण केलेले नसून त्याचा खर्च शुन्य आहे याची नोंद घेण्यात आली.** | |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १७ ] | **श्री. सचिन मारुती गायकवाड, अधिसभा व व्यवस्थापन परिषद सदस्य यांचे दि.१५/१२/२०२३ रोजीचे पत्र (आवक क्र. ६३०१ व ६३०२) विचारार्थ.**<br>टिपणी: १) आवक क्र. ६३०१ नुसार श्री. सचिन मारुती गायकवाड यांनी विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या पेट-८ च्या पीएच.डी प्रवेश प्रक्रियेत निर्धारित कालावधीत गाईड कडे जागा शिल्लक असताना तसेच विद्यार्थी वेटिंग असताना सुध्दा त्यांचे अलॉटमेंन्ट जाणीवपूर्वक केले नाही. त्यामूळे अनेक विद्यार्थ्यांना पीएच.डी प्रवेशापासून वंचित रहावे लागले याबाबत माहिती घेवून संबंधितांवर कार्यवाही करावी तसेच रिक्त असलेल्या जागांवर वेटिंग असलेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश दिल्याशिवाय पेट-९ ची प्रक्रिया सुरु करु नये अन्यथा आंदोलन करु असे पत्रात नमूद करुन सदरचा विषय दि. २२/१२/२०२३ रोजीच्या होणाऱ्या व्यवस्थापन परिषदेत ठेवण्यात यावा अशी विनंती केली आहे.<br>याबाबत कार्यालयीन निवेदन असे की,<br>आवक क्र. ६३०१ पत्रानुसार मा. व्यवस्थापन परिषद सदस्यांनी कोणत्या विषयाची जागा शिल्लक असतानाही वेटिंगच्या विद्यार्थ्यांचे अलॉटमेंट केले नाही याबाबत उल्लेख केला नाही. त्यांनी सदरील तक्रार ही मोघम स्वरुपाची दिलेली आहे. संबंधित विषयाचे नाव दिल्यास याबाबत माहिती देणे इष्ट होईल. तरीही पेट-८ मधील नियम क्र. ४.१० (C) नुसार If all seats are not filled in the first round, another round of DRC/CRC may be called by calling next candidates in the merit list in the ratio of १:३ and so on. Whereas while preparing the merit list for second round, first student who could not be admitted in first round will be called as per there merit. अशी तरतूद आहे.<br>उक्त नियमानुसार पेट-८ च्या सर्व विषयांकरीता २ फेऱ्या घेण्यात येऊन संपूर्ण प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली आहे. तसेच पेट-८ मधील उपलब्ध/रिक्त सर्व जागा वितरित करण्यात आलेल्या आहेत. पीएच.डी प्रवेश प्रक्रियेअंतर्गत पीएच.डी अभ्यासक्रमाकरीता विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतला आहे किंवा नाही याबाबत ची माहिती संशोधन केंद्र व संशोधक मार्गदर्शक यांच्याकडे असते. पेट-८ ची संपूर्ण प्रवेश प्रक्रिया ही विद्यापीठाच्या पेट-८ तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नियमानुसार झालेली आहे. यासाठी विद्यापीठाने पीएच.डी प्रवेश समिती गठित केली होती. या समितीच्या नियंत्रणाखाली सदरील सर्व प्रक्रिया पार पडलेली आहे. | संशोधन विभाग |

२) आवक क्र. ६३०२ च्या पत्रान्वये श्री गायकवाड यांनी पुढील मूद्यांबाबत सूचना दिलेली आहे.

१) पु.अ.हो.सो.वि.सो च्या वतीने घेण्यात येणाऱ्या पेट-९ साठी आपल्या विद्यापीठाअंतर्गत असलेल्या UG महाविद्यालयातील पात्र पीएच.डी गाईडना विद्यार्थ्यांच्या हितासाठी मान्यता देणेचा ठराव मी सभागृहासमोर ठेवत आहे.

२) सन २०२१ ते डिसेंबर २०२२ पर्यंत केलेले वृक्षारोपन व त्याचा खर्चाचा अहवाल सादर करणेबाबतचा ठराव सभागृहासमोर ठेवत आहे.

३) पेट-८ मध्ये गाईडकडे जागा शिल्लक असताना व विद्यार्थी वेटींग असताना प्रवेश प्रक्रिया पासून विद्यार्थी वंचित राहीले याबाबत जबाबदार कर्मचाऱ्यांवर कारवाईसाठी समिती गठित करावी.

याबाबत कार्यालयीन निवेदन असे की,

मूद्या क्र. १ बाबत UGC च्या दिनांक ७ नोंव्हेंबर २०२२ रोजीच्या नियमानुसार जे पात्र अध्यापक आहेत. त्यांना संशोधन व मान्यता समिती (RRC) संशोधक मार्गदर्शक म्हणून मान्यता देते. तसेच ज्या महाविद्यालयात संबंधित विषयाचे पदव्यूत्तर अभ्यासक्रम सुरु आहे अशा संशोधक मार्गदर्शकांना DRC/CRC समिती विद्यार्थी वितरित करतात.

मूद्या क्र. २ हा NSS विभागाशी निगडीत आहे.

मूद्या क्र. ३ नुसार पेट-८ नियमावलीनुसार प्रवेशाच्या दोन फेऱ्या घेवून संपूर्ण प्रक्रिया /कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच पेट-८ करीता जाहीर आरक्षण तक्त्यानुसार रिक्त जागा सदर २ फेऱ्याद्वारे भरलेल्या आहेत.

सबब, श्री. सचिन मारुती गायकवाड, अधिसभा व व्यवस्थापन परिषद सदस्य यांचे दि.१५/१२/२०२३ रोजीचे पत्र (आवक क्र. ६३०१ व ६३०२) विचारार्थ सादर.

**ठराव:** **श्री. सचिन मारुती गायकवाड, अधिसभा व व्यवस्थापन परिषद सदस्य यांचे दि.१५/१२/२०२३ रोजीच्या पत्राची नोंद घेण्यात आली असून, पीएच. डी. प्रवेश परीक्षा (PET) ही PET-८ च्या नियमावलीनुसार प्रवेशाच्या दोन फेऱ्या घेवून संपूर्ण प्रक्रिया / कार्यवाही तत्कालीन नियमानुसार करण्यात आलेली आहे असे निदर्शनास आले.**

**तसेच पीएच. डी. प्रवेश परीक्षा (PET) करीता नियमावलीच्या गठीत केलेल्या समितीमध्ये खालील सदस्यांचा समावेश करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.**

**१) प्रा. (डॉ.) बाळकृष्ण जगन्नाथ लोखंडे**
**२) प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार**
**३) डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज**

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[१८(१)]</td><td>

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२८(१) व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दीक्षांत समारंभ) एकरुप परिनियम २०१८ मधील परिनियम क्र.५ नुसार प्रस्तुत विद्यापीठाच्या १९ व्या दीक्षांत समारंभामध्ये मार्च / एप्रिल, २०२३ अखेर (डिसेंबर, २०२३ अखेर पर्यंत विद्यावाचस्पती पदवी संपादित करणाऱ्या विद्यार्थ्यांना) सर्व विद्याशाखेमधील ज्या व्यक्ती / विद्यार्थी पदवी, पदविका, प्रमाणपत्रे प्रदान करण्याकरिता पात्र आहेत अशा व्यक्तींना पदवी, पदविका आणि प्रमाणपत्रे प्रदान करण्याची विद्यापरिषदेची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाच्या वतीने घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये जे विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत, अशा विद्यार्थ्यांना पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे, विद्यावाचस्पती पदवी प्रदान करण्याबाबत महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मध्ये खालीलप्रमाणे तरतूदी आहेत.

<table>
<tr><td>कलम १२८(१)</td><td>“व्यवस्थापन परिषदेस, विद्यापरिषदेकडून शिफारस करण्यात येतील अशा पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व विद्याविषयक इतर विशेषोपाधी सुरु आणि प्रदान करता येतील.”</td></tr>
<tr><td>कलम १३०</td><td>“विद्यापीठाचा दीक्षांत समारंभ हा, पदव्या पदव्युत्तर पदविका प्रदान करण्याकरिता किंवा इतर कोणत्याही प्रयोजनाकरिता परिनियमाद्वारे विहीत करण्यात आलेल्या रितीने, शैक्षणिक वर्षातून किमान एकदा करण्यात येईल.”</td></tr>
</table>

उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन यांच्या दि.१०/१०/२०१८ रोजीच्या अधिसूचनेनुसार प्रकाशित करण्यात आलेल्या एकरुप परिनियम क्र.४ व ५ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दीक्षांत समारंभ) एकरुप परिनियम २०१८ मध्ये खालीलप्रमाणे तरतूदी आहेत.

परिनियम क्र.४: “दीक्षांत समारंभापूर्वीच्या बैठकीमध्ये विद्यापरिषद, ज्या व्यक्ती पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व विद्याविषयक विशेषोपाधी प्रदान करण्याकरिता पात्र आहेत अशा व्यक्तींच्या नावांची व्यवस्थापन परिषदेकडे शिफारस करील. विद्यापरिषदेच्या शिफारशीवरुन, व्यवस्थापन परिषद, अशा पात्र व्यक्तींना अशा पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे आणि विद्याविषयक विशेषोपाधी प्रदान करण्याकरिता मान्यता देईल.”

परिनियम क्र.५: “विद्यापीठ अनुदान आयोगाकडून विनिर्दिष्ट करण्यात आणि अधनियमाच्या तरतूदीनुसार विद्यापीठाकडून संस्थापित करण्यात आल्याखेरीज, कोणतीही पदवी, पदविका, प्रमाणपत्र व विद्याविषयक विशेषोपाधी प्रदान करण्यात येणार नाही. अशा पदव्या, पदविका, प्रमाणपत्रे व विद्याविषयक विशेषोपाधी आदेशाद्वारे विहीत करण्यात येतील.”

</td><td>परीक्षा व मूल्यमापन विभाग</td></tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | उपरोक्त महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२८(१) व कलम १३० नुसार आगामी १९ व्या दीक्षांत समारंभाची कार्यवाही करणे आवश्यक असल्याने, व उच्च व तंत्र शिक्षण विभाग महाराष्ट्र शासन यांच्या दि.१०/१०/२०१८ रोजीच्या अधिसूचनेनुसार प्रकाशित करण्यात आलेल्या एकरुप परिनियम क्र.४ व ५ महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दीक्षांत समारंभ) एकरुप परिनियम २०१८ मधील तरतुदीनुसार विद्यापीठ अनुदान आयोगाकडून विनिर्दिष्ट करण्यात आणि अधिनियमाच्या तरतूदीनुसार विद्यापीठाकडून संस्थापित करण्यात आलेल्या विविध पदवी, पदविका, प्रमाणपत्र व विद्याविषयक विशेषोपाधी यांची अभ्यासक्रमाची यादी प्रस्तुत विद्यापीठाच्या संलग्नता विभाग व आस्थापना विभागाकडून प्राप्त झाली असून त्याची यादी सोबत जोडण्यात आली आहे.<br>उपरोक्त तरतूदीच्या अनुषंगाने कार्यवाही करणेकामी दि.२२/१२/२०२३ रोजीच्या विद्यापरिषदेच्या बैठकीत विषय क्र.०२ नुसार विषय सादर करण्यात आला असून त्याची प्रत सोबत जोडली आहे.<br>सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतूद विचारात घेता, आगामी संपन्न होणाऱ्या १९ व्या दीक्षांत समारंभाकरीता मार्च / एप्रिल, २०२३ अखेर सर्व विद्याशाखेच्या परीक्षेमध्ये उत्तीर्ण झालेल्या व डिसेंबर, २०२३ अखेर पर्यंत विद्यावाचस्पती पदवी संपादित करणाऱ्या स्नातकांना पदव्या, पदविका, प्रमाणपत्र प्रदान करण्याची बाब महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२८(१) तसेच कलम १३० व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दीक्षांत समारंभ) एकरुप परिनियम २०१८ अन्वये विद्यापरिषदेची शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | |
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १२८(१) व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (दीक्षांत समारंभ) एकरुप परिनियम २०१८ मधील परिनियम क्र.५ नुसार प्रस्तुत विद्यापीठाच्या १९ व्या दीक्षांत समारंभामध्ये मार्च / एप्रिल, २०२३ अखेर (डिसेंबर, २०२३ अखेर पर्यंत विद्यावाचस्पती पदवी संपादित करणाऱ्या विद्यार्थ्यांना) सर्व विद्याशाखेमधील ज्या व्यक्ती / विद्यार्थी पदवी, पदविका, प्रमाणपत्रे प्रदान करण्याकरिता पात्र आहेत अशा व्यक्तींना पदवी, पदविका आणि प्रमाणपत्रे प्रदान करण्याची विद्यापरिषदेची शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

मा. कुलगुरु, मा. प्र-कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद